MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal

Issue-23, Vol-06 January to March-2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner

13) Biography and literary stage of Nadine Gordimer
**Wagh M. B., Shirpur, Dist-Dhule.** || 75

14) DIGITAL INDIA AND ITS IMPACT
**Dilpreet Kaur, Ludhiana** || 78

15) Comparative Study on Financial Performance of State Bank of India...
**Mahammadali Abbasbhai Masi, Dist.: Mehsana, (Gujarat)** || 82

16) ROLE OF YOGA ON HEIGHT
**Dr. Rajendra Singh--Deepak Raghav, Aligarh.** || 85

17) वस्तू व सेवाकर कायदा--एक अध्ययन
**प्रा.डॉ.एम.बी.कदम, उमरखेड** || 90

18) महिला सबलीकरण : शासनाच्या प्रयत्नाचा अभ्यास
**प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव, देगलूर.** || 94

19) बिब्लिओमेट्रीक्स
**डॉ. चंद्रशेखर आर. तिरपुडे--सय्यद फय्याज खाजामीयाँ** || 98

20) धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील उच्च शिक्षणात विद्यापीठ अनुदान आयोगाची (यु.जी.सी.) भूमिका.
**प्रा.व्ही.आय.गिरासे-प्रा.डॉ.एन.बी.गोसावी, नंदुरबार** || 101

21) स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीचे विवेचन
**प्रा.किशोर एल. बोंडे, तह.नरखेड, जि.नागपूर** || 107

22) 'मुद्रा स्फीति का देश के आर्थिक विकास पर प्रभाव'------
**डॉ. स्निग्धा भट्ट--डॉ. दीपक जैन, इन्दौर** || 112

23) जैविक कृषि एवं जलवायु परिवर्तन
**डॉ० प्रियंका जायसवाल--डॉ० देवेन्द्र कुमार चौहान--डॉ० चन्द्रभान** || 115

24) कृष्णनाथ के यात्रा--वृत्तों में प्रकृति चित्रण
**पिंकी कोठारे, पोस्ट मुंदी, जिला खंडवा** || 120



Scanned by CamScanner

18

# महिला सबलीकरण : शासनाच्या प्रयत्नाचा अभ्यास


प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर.


प्रस्तावना :-

जागतिकीकरणानंतर भारतीय समाज, अर्थ व शासन ज्यामध्ये काही प्रश्न आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय संदर्भ व अर्थ असलेले आहेत. तर काही प्रश्नांना येथील सामाजिक, धार्मिक, लैंगिक संदर्भ आहेत. उदा : दहशतवाद, मानवी हक्क, पर्यावरण, महिला सबलीकरण, शेतकरी आत्महत्या, बालमजूरी, बाल गुन्हेगारी इ. या सर्व प्रश्नांनी आंतरराष्ट्रीय जगताला प्रभावित केले आहे. प्रस्तुत लेखात महिला सबलीकरण या संकल्पनेचा अर्थ समजून घेवून तिच्या यशस्वितेसाठी शासकीय (केंद्रीय) व सामाजिक पातळीवर झालेल्या प्रयत्नांना समजून घेवून त्यासमोरील समस्यांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. जे सर्वथा भारतीय संदर्भाने आहे. प्रस्तुत लेखाची मांडणीसर्वसमावेशक व्हावी यासाठी शासनाने महिला सबलीकरणासाठी केलेल्या योजना आधार मानुन त्यांचे सबलीकरणासाठी केलेल्या योजना आधार मानुन त्याचे उद्देश स्पष्ट करण्यात आले. यासाठी ग्रंथालयीन व विश्लेषणात्मक अभ्यास पध्दतीचा आधार घेण्यात आला. प्रस्तुत लेखाला अर्थपूर्णता प्राप्त व्हावी, म्हणून आवश्यक तथ्यांचे संकलन ग्रंथालयातील विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्र, नियतकालिके आणि इंटरनेटचा वापर करून करण्यात आले. तसेच महिला सबलीकरणाची संकल्पना अति व्यापक आहे. तिच्या अंमलबजावणीत अनेक अडथळे असून त्यास पार करुन जाण्यासाठी शासन प्रयत्नांची पराकाष्ट करत असल्याचे गृहित धरुन या लेखाची मांडणी करण्यात आली.

महिलांच्या सबलीकरणास व्यवहारात आणण्यासाठी भारतीय राज्यघटनेत प्रारंभापासूनच तरतूद करण्यात आली. भारताने प्रारंभापासूनच महिलांचा समान अधिकार प्राप्त करण्यासाठी करण्यात आलेल्या विविध आंतरराष्ट्रीय करार, जाहिरनामे आणि मानवी हक्काच्या तरतूदीचे समर्थन केले. यात १० डिसेंबर १९४८ चा संयुक्त राष्ट्र संघटनेचा मानवी हक्काचा वैश्विक जाहिरनामा, यासह पुनोन महिला सबलीकरणा संदर्भात आजपर्यंत घेतलेल्या प्रत्येक धोरणाचे भारताने समर्थन केले. महिलांच्या जीवनात सकारात्मकता यावी, पुरुषप्रधान समाजात तिला मोकळा श्वास घेता यावा यासाठी केलेल्या प्रत्येक तरतूदीस प्रमाण मानुन त्यास भारतीय परिस्थितीनुरुप लागू करण्याचा प्रयत्न केला. एखादे राष्ट्र किती प्रगतशील, विकसित आहे, त्या देशाची परंपरा व संस्कृति किती लोकशाहीवादी आहेत हे त्या देशातील महिलांच्या स्थितीकडे पाहून सांगता येते. एका बाजून महिलांना माता, देवी, शक्ती, सरस्वती म्हणून तिचीपूजा करणारा समाज दुसऱ्या बाजूने तिचे अतोनात शोषण करतो. शासनाच्या प्रत्येक योजनेत पुरुषाच्या तुलनेत तिला दुजाभाव दिला जातो. वाढता लिंगभेद माता व बालकांचे कुपोषण वाढत आहे. कुपोषणाचा परिणाम गर्भातील बालकावर होतो. लहान वजनाच्या अपत्य जन्मास येते. परिणामत: स्वस्थ व सुदृढ बालक-बालिका निर्माण होत नाहीत. मातेचे कुपोषण कुपोषित बालके यांचे ऱ्हदयरोगाशी फार जवळचा संबंध आहे.

महिला सबलीकरण ही एक महत्वपूर्ण सामाजिक संकल्पना आहे. यास समजून घेण्यासाठी तिचा बहुआयामी पदर जाणुन घ्यावा लागेल. ज्यात सामाजिक, कौटुंबिक, राजकीय सोबत मानसिक घटक महत्वाचे आहेत. राजकीयदृष्ट्या विचार करता देशातील अर्धी लोकसंख्या महिलांची आहे. ज्यांना पुरुषांच्या तुलनेत समप्रमाणात मतदानाचा व निवडणूक लढवण्याचा अधिकार आहे. परंतू व्यवहारात सर्वच महिला याचा वापर करत नाहीत. लोकशाही प्रक्रियेतून निवडून आलेल्या महिलांनाही त्यांच्या अधिकाराचा वापर स्वतंत्रपणे व स्वविवेकाने करता येत नाही. महिलांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण मतदानापर्यंत वाढते. परंतु सत्तेतील सक्रिय सहभाग व निर्णय निर्धारणातील प्रमाण नगण्यच आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीचा विचार करता सर्वसाधारणपणे ते १०% च्या पुढे गेले नाही.

२०११ च्या जनगणनेतील आकडेवारी पाहता महिलां संदर्भातील बरेच तथ्य व गुपित उघडकीस येतात. देशात स्त्री आणि पुरुषांचे प्रमाण विषम आहे. शून्यापासून सहा वर्षांपर्यंतच्या बालकात लिंगानुपात मुलांच्या बाजुने झुकतो. २००१ च्या जनगणनेत लिंगानुपात



Scanned by CamScanner

९२७ होता तर २०११ च्या जनगणनेत कमी होऊन ९१४ झाले. आर्थिक [illegible] महिला कमकुवत व वंचित आहेत. कृषि, उद्योग, सेवाक्षेत्रात [illegible] प्रमाण व सहभागित्व नगण्यच आहे. वेतन मिळणाऱ्या [illegible] महिलांची संख्या कमी आहे. परावलंबित्वाचे जीवन जगणाऱ्या महिलांचे प्रमाण वाढत आहे. यासर्व बाबी पाहता महिला आजही [illegible] वंचित आहेत. महिलांना व्यवस्थेत सहभागी करून घेऊन त्यांच्यावर अनादी काळापासुन होणारा अन्याय व शोषण संपविण्याचे एकत्रित नाव म्हणजे महिला सबलीकरण होय.

महिला सबलीकरण म्हणजे महिलांना पुरुषासमान कायदेशीर, राजकीय, मानसिक, सामाजिक, कौटुंबिक व आर्थिक क्षेत्रात निर्णय घेवून त्याची अंमलबजावणी करण्याचे स्वातंत्र्य देणे होय. त्या स्वतः जीवन जगु शकतील असा आत्मविश्वास आणि स्वाभिमान त्यांच्यात जागृत करणे. महिला सबलीकरण ही एक बहुआयामी व विकसनशील प्रक्रिया आहे. जिचा उद्देश समताधिष्ठित व न्यायमुक्त समाजाची स्थापना करणे आहे. या देशातील सर्वच समस्यांच्या मुळाशी विषमता आहे. तसेच समाजातील पितृसत्ताक विचारधारा व त्यावरील निष्ठेने समस्यांचा उदय झाला. महिलांसोबत होणारा व्यवहार समान, समताधिष्ठीत असावा, तरच देश, समाज विकासात त्यांचे संपूर्ण सहकार्य मिळेल. ते मिळवण्यासाठी आवश्यक उपाय तुरे करावे लागतील.

भारतासारख्या विशाल भूभाग व लोकसंख्या असणाऱ्या देशात महिला आणि बालकांच्या विकासासाठी शासन, प्रशासन व समाजात समन्वय राहावा म्हणून २००६ साली स्वतंत्र महिला आणि बालविकास मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. या मंत्रालयामार्फत महिला आणि बालकांचे हक्क सुरक्षित राहणारे कार्य पुढे नेणे त्यांची उपजीविका, सुरक्षा, विकास व योगदानास प्रोत्साहित करण्याचे कार्य केले जाते.

हिंसा, शोषण व भेदभाव विरहीत वातावरणात महिलांनी सन्मानाने राहावे, विकासात पुरुषांप्रमाणेच समान योगदान द्यावे. महिलांना मुख्य प्रवाहाशी जोडणे, त्यांना अधिकाराबाबत जागरुक करणे. मानवी हक्क आणि संपूर्ण विकासासाठी संस्थात्मक व कायदेशीर समर्थन देवून महिलांच्या सामाजिक व आर्थिक सबलीकरणास प्राधान्य देणे.

महिलांचे सबलीकरण व्हावे यासाठी भारताने प्रारंभापासूनच सकारात्मक पाऊले उचलले. स्त्री-पुरुष समतेचा सिध्दांत व त्यास पुरक कायद्यांची मांडणी राज्यघटनेतून केली. महिलांतील भेदभाव नष्ट करण्याच्या उद्देशाने राज्यघटनेत शासन व प्रशासनास विविध अधिकार राज्यघटनेत दिले. राज्यघटनेनेच महिलांना पुरुषांच्या समान मानले. भारतीय राज्यघटनेत महिलांच्या सबलीकरणासाठी व सुरक्षेसाठी कलमांच्या तरतुदीचा मुख्यत्वे खालील प्रकार करता येईल. ज्यात मूलभूत अधिकार अंतर्गत कलम १४ नुसार सर्व व्यक्तिंना कायद्यापुढे समान मानले. कलम १५ नुसार धर्म, जात, लिंग इत्यादींच्या आधारावर भेदभाव करू नये. महिला आणि बालकांसाठी विशेष तरतूद करण्यात आली. राज्यसंस्थेत शासन, प्रशासनासह इतर कोणत्याही ठिकाणचे पद व रोजगार मिळवण्यात समान संधी कलम १६ नुसार देण्यात आली. महिलांना आपल्या उपजीविकेसाठी लागणारी सर्व साधने जमा करण्याचा अधिकार मार्गदर्शक तत्वातील कलम ३९ ने दिला. समान कामासाठी समान वेतनाचा अधिकारही कलम ३९ ने दिला. याशिवाय ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीने पंचायती संस्थेत महिलांना ३३% आरक्षण देण्यात आले. याही पुढे जाऊन अनेक राज्यांनी ५०% आरक्षणाची तरतूद केली. ज्यामुळे महिला सबलीकरणास अधिक बळकटी आली.

महिला सबलीकरण हे लोकशाहीच्या यशाची एक अट आहे. या अटीच्या पूर्ततेचा प्रारंभ ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीने अधिक प्रमाणात झाला. त्यामुळे याठिकाणी महिला सबलीकरणातील स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. पंचायती राजमुळे सामाजिक व संस्थात्मक स्तरावर सकारात्मक बदल झाला. राजकीय सबलीकरणातून सामाजिक सबलीकरणाचे प्रयत्न पंचायती राजमध्ये होत आहेत. महिला सबलीकरणाच्या दृष्टीने पंचायती राजचे अधिक महत्व सिध्द झाले. ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीने महिलांचा सहभाग वाढवला. त्यांच्या सर्वांगिण स्थितीत व्यापक बदल झाला. १९९३ पासून ते २०१७ पर्यंतचा विचार करता पंचायतीतून महिलांच्या राजकीय सबलीकरणात सकारात्मक बदल झाला. राजकीय घडामोडीत महिलांचे स्थान महत्वपूर्ण बनले. अलिकडे पंचायतीत महिलांचे ५०% प्रमाण आहे. त्यामुळे ग्राम विकास, नगर विकास व तालुका विकास आणि निर्णय निर्धारणातील त्यांची सक्रियता वाढत आहे. महिलांनी या संधीचा अधिक फायदा घेवून स्वतःमध्येही गुणात्मक बदल केले. परिणामतः शहर, राज्य, राष्ट्र व आंतरराष्ट्रीय घटनाक्रमातील महिलांचा सहभाग वाढला. त्यांचा अनुभवाचा फायदा देशाला ग्रामीण विकासाचे धोरण आखताना होत आहे. ग्राम विकासाचे



Scanned by CamScanner

बजट कसे पूर्ण करुन घ्यावे ते महिलांमुळे शासनाला अधिक सोपे झाले. पंचायती राज व्यवस्थेने महिलांना स्वत: प्रती दृष्टिकोन बदलण्यासाठी अधिक मदत केली. पंचायती संस्थान निवडून आलेल्या महिलांनी ग्रामीण भागापासून स्त्रीवादाच्या विचारास मजबूत केले. स्वत: चे नेतृत्व गुण सिध्द करुन स्वत:ची शक्ती समाज व राष्ट्राला दाखवून दिली. महिलांच्या संकल्पना व जागरुकतेमुळे पाणी, शिक्षण, आरोग्य, कौटुंबिक हिंसा, दारु, शोषण आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला अधिक प्राथमिकता दिली. खेड्यातील ग्राम सभेतील विषयात बदल झाला. महिलांच्या वाढत्या सहभागाने ग्रामपंचायत सभा, ग्रामसभा इत्यादीत गरीबी निर्मूलन, अन्न सुरक्षा, सामाजिक सुरक्षा, बालविकास, अपंग कल्याण, वृध्द कल्याण व महिला विकास इ. सामाजिक व विकासात्मक विषयावर अधिक चर्चा होतो. महिलांच्या सबलीकरणास अडथळा ठरणाऱ्या अनेक घटना व विषयाच्या विरोधात महिलांचे संघटन वाढत आहे. ज्या भागात महिलांचा सहभाग अधिक सक्रिय आहे तेथे विकासाचे सर्वसमावेशक स्वरुप दिसून येते. ज्या विषयीची आंतरराष्ट्रीय समुदाय चर्चा करते त्याच विषयावर महिला ग्रामीण भागात चर्चा करुन ते प्रश्न सोडवण्याचा उपाय आपसी चर्चेतून काढतात.

महिला सबलीकरण हा स्वातंत्र्यापासून ते वर्तमानातील नरेंद्र मोदी शासनासमोरील एक महत्वाचे ध्येय आहे. या ध्येयाच्या पूर्तीसाठी भारत शासन स्वातंत्र्यापासून अनेक धोरण व योजनांची आखणी करते. ज्यात पाचव्या पंचवार्षिक योजनेत महिलांच्या विकासावर भर देण्यासाठी अनेक धोरणाचा स्विकार करण्यात आला. आठव्या योजनेत महिला सबलीकरण व विकास प्रक्रियेत महिलांना समान भागीदारी बनवण्यावर भर देण्यात आला. तर अकरा, बारा, तेरा, योजनेत सर्वसमावेशक विकासावर भर देण्यात आला. मागील दहा वर्षांच्या काळात महिला, बालकल्याणासाठी अनेक विकासात्मक योजनांचा प्रारंभ करण्यात आला. ज्यामुळे महिलांच्या सबलीकरणा प्रतिच्या आमच्यातील जागरुकता वाढली. ज्याचा उल्लेख खालीलप्रमाणे करता येईल.

अ) मनरेगाच्या माध्यमातून ३०% महिलांना रोजगाराचे आरक्षण करण्यात आले. या योजनेचा अधिक फायदा घेणाऱ्यात महिलांचे प्रमाण लक्षणीय आहे. नवव्या पंचवार्षिक योजनेत शासनाने महिलांना व्यवसाय व कौशल्याचे प्रशिक्षण व शिक्षण देण्याची तरतूद केली. २०१० साली महिला व बालविकास मंत्रालयामार्फत २०० जिल्ह्यांत सकस योजनेचा प्रारंभ झाला. ज्याचा उद्देश मुलांचा सर्वांगीण विकास करणे, त्यांच्या पोषण आहार व स्वास्थ्यात सुधारणा, जीवन कौशल्य व व्यावसायिक कौशल्य सशक्त बनवणे, महिलांच्या बचत गटास शासनाच्या बँकेतून कमी व्याज दराने कर्ज मिळवून देण्याची सुरु करण्यात आली.

ब) २२ जानेवारी २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महिलांच्या लिंगानुपात वाढ व्हावी म्हणून एक महत्वाची योजना सुरु केली. ज्यास आपण बेटी बचाओ बेटी पढाओ या नावाने ओळखतो. या योजनेचा प्रारंभ मुलींच्या जन्मावर आनंदोत्सव साजरा करणे, मुली शिशुभ्रूण हत्या रोखणे, मुलींचे शिक्षण व सबलीकरण निश्चित करणे आणि मुलींचे उत्तरदायित्व आणि संरक्षण सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने करण्यात आला. भारतातील सर्व राज्यांत या योजनेचा प्रारंभ झाला. या योजनेमुळे महिला सबलीकरणास पाठबळ मिळाले.

नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र शासन महिला सबलीकरणाप्रती कटिबध्द असल्यामुळे बेटी बचाओ-बेटी पढाओ या योजनेप्रमाणेच सुकन्या समृध्दी योजना, सुरु केली. या योजनेअंतर्गत मुलींचे उच्च शिक्षण आणि त्यांचा विवाहास प्राधान्य दिले. महिला सबलीकरण हा विषय २१ व्या शतकात ज्वलंत आहे. भारताला जागतिक महासत्ता बनवण्यात महिला सबलीकरणाची भूमिका महत्वाची आहे. जागतिकीकरणाच्या युगात महिला सबलीकरणाचे ध्येय साध्य करण्यासाठी भारत शासन कायदेशीर, सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात महत्वपूर्ण पाउल टाकत आहे. २००१ सालच्या वाजपेयी शासनाने राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरण बनवले. या धोरणात महिलांना शक्तीसंपन्न बनवण्यासोबतच त्यांचा विकास व उन्नतीचे धोरण आहे. महिलातील संपूर्ण क्षमताचा विकास करण्यासाठी आर्थिक व सामाजिक धोरण आखुन पोषक वातावरण उपलब्ध करुन देणे. ज्यामुळे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात महिलांना समान अधिकार व सुविधा मिळतील. ज्यामुळे त्यांना आरोग्य, शिक्षण, उपजीविका व रोजगाराच्या क्षेत्रात रोजगार उपलब्ध होईल. महिलांप्रति होणाऱ्या सर्वप्रकारच्या भेदभावाचे उन्मूलन करुन त्यांना कायद्याचे संरक्षण द्यावे. महिला व बालकांसोबत होणारी सर्वच प्रकारची हिंसा व भेदभाव नष्ट करावेत. तसेच या धोरणात पुरुष आणि महिला दोघांच्या सक्रिय भागीदारीतून सामाजिक वातावरणात बदल घडवण्याची भूमिका आहे.

महिलांच्या सबलीकरणात सर्वांत मोठी अडचण म्हणजे



Scanned by CamScanner

त्यात कुटुंबात होणारा शोषण व हिंसा आहे. भारतात [illegible] होणारा वाढता शोषण व हिंसाचार रोखण्यासाठी केंद्र शासनाने २००५ साली कौटुंबिक हिंसाचार अधिनियम बनवला. जो २६ ऑक्टोबर २००६ पासून संपूर्ण देशात लागू झाला. या कायद्याने प्रथमच कौटुंबिक संबंध व कौटुंबिक हिंसेची स्पष्ट व्याख्या केली. या कायद्यात बहिण, विधवा, मुलगी, [illegible] व सर्वांना या नियमा अंतर्गत समाविष्ट केले. या कायद्याने कौटुंबिक हिंसेचा व्यापक अर्थ स्पष्ट केला. कौटुंबिक हिंसा रोखण्याची जबाबदारी या कायद्याने केंद्र व राज्य शासनास सोपवली. यासाठी प्रत्येक राज्याने एक आश्रय स्थानाची व्यवस्था करावी. ज्यात संयुक्त कुटुंब व्यवस्थेत राहण्याची इच्छा नसणाऱ्या महिलांच्या निवासाची व्यवस्था होईल. आपल्या अधिकारासाठी संघर्ष करणाऱ्या महिलांना एक सुरक्षा अधिकारी मिळेल जो न्यायालय आणि महिलांत मध्यस्थाची भूमिका बजावेल.

महिला सबलीकरण या विषयासाठी ८ मार्च २०१० रोजी राष्ट्रीय महिला सबलीकरण अभियानाचा प्रारंभ केला. केंद्रातील अनेक मंत्रालय आणि राज्य शासनातील विविध परिषदा, चर्चासत्र, संमेलनातून महिलांचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सबलीकरण हा या अभियानाचा उद्देश आहे. या अभियानाचे अध्यक्ष पद पंतप्रधानांकडे आहे. डॉ.मनमोहन सिंग व श्री नरेंद्र मोदी यांनी या अभियानाचे अध्यक्षपद भूषवले. त्यांच्या सहकार्यासाठी १३ मंत्री सदस्य असतील. यांच्या मदतीसाठी केंद्रीय समिती आणि अंतर मंत्रालय समिती असते. महिलांचे आर्थिक सबलीकरण करुन त्यांच्या प्रती होणाऱ्या हिंसांना कमी करणे या अभियानाचा मुख्य हेतू आहे.

महिलांचे शोषण आणि हिंसाचे प्रमाण दिवसोंदिवस वाढत आहे. त्याचे नेमके ठिकाण सांगता येणार नाही. जागतिकीकरणाच्या युगात महिलांच्या आर्थिक सबलीकरणात वाढ झाली. कारण की महिलांचे घराबाहेर पडून शिक्षण घेवून काम करण्याचे प्रमाण वाढले. तर दुसऱ्या बाजूने या कामाच्या ठिकाणी महिलांच्या शारिरीक, मानसिक शोषण, बलात्कार, हिंसा व खूनाचे प्रमाण वाढत आहे. या कामकाजी महिलांचे कामाच्या ठिकाणी होणारे शारिरीक शोषण थांबवण्यासाठी २०१० साली एक विधेयक पास करण्यात आले. याशिवाय राज्यघटनेत महिलांना समानतेचा अधिकार देण्यासाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी अनेक तरतुदी आहेत. यास अधिक मजबुती प्राप्त व्हावी म्हणून भारताने महिलांशी आहेत. यास अधिक मजबुती प्राप्त व्हावी म्हणून भारताने महिलांशी संबंधित सर्व प्रकारचे भेदभाव नष्ट व्हावेत. महिलांच्या [illegible] केल्या. या ठिकाणी [illegible] महिलांच्या कामाच्या ठिकाणी होणा या शोषणावर बंदी आणणारे २०१० चे विधेयक समजून घेऊया. कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करुन देणे. महिलांना समतेचा अधिकार देऊन सन्मानाने जीवन जगण्याचे अधिकाराची चर्चा या विधेयकात आहे. ज्या कंपन्या किंवा कार्यालयात महिला कर्मचारी अधिक आहेत. त्यांनी महिलाचे गाऱ्हाणे, तक्रार ऐकून घेण्यासाठी एक समिती असावी. जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातही अशा प्रकारचे केंद्र स्थापन करावे. या केंद्रात शोषित, पीडित व अन्यायग्रस्त महिलांनी तक्रार दाखल करावी. या विधेयकाने सार्वजनिक व खाजगी दोन्ही क्षेत्रात मग ते संघटित असो की नसो शारिरीक शोषण होणाऱ्या महिलांना सुरक्षितता द्यावी.

महिला सबलीकरणातील अनेक प्रकारापैकी आर्थिक सबलीकरण हा एक महत्वाचा प्रकार आहे. महिलांचे आर्थिक सबलीकरण व्हावे म्हणून २००५-०६ मध्ये लिंगाधारित अंदाजपत्रकाचा मुद्दा मांडण्यात आला. त्याचा प्रारंभही करण्यात आला. महिला आणि बालकल्याण मंत्रालयाने लिंगाधारित अंदाजपत्रकासाठी एक नियंत्रक मंत्रालय बनवावे. ज्याचा अवलंब अनेक मंत्रालयांनी केला. तसेच महिलांच्या आर्थिक गरजांना पूर्ण करण्यासाठी महिला बँक स्थापन करण्याचा निर्णय घेतला. उषा अनंत सुब्रमण्यम यांना या बँकेच्या पहिल्या अध्यक्ष म्हणून नियुक्त केले. या बँकेमार्फत महिला आर्थिक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. या बँकेने १०० करोड रुपयांपासून आपल्या कार्यास प्रारंभ केला.

**संदर्भ ग्रंथ :**

१) महिला-सक्षमीकरण:स्वरुप आणि विकास-संपादक-प्रा.पांडुरंग मुळे-अरुणा प्रकाशन-लातूर-२०१६.

२) राजकीय सिध्दांतातील मुलभूत संकल्पना-प्रा.दिगंबर आ.खेडकर-चिन्मय प्रकाशन-औरंगाबाद-२००९.

□□□

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded



Scanned by CamScanner